## वार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूकीची सूचना दिनांक १५ सप्टेंबर २०२५ चे शुध्दिपत्रक

**स्पीड पोस्ट / ई-मेल व्दारे**

**प्रति,** **दिनांक :-** १ ऑक्टोबर २०२५

**मा. अध्यक्ष / सचिव,**
सर्व संलग्न व सहयोगी राज्य क्रीडा संघटना.

**विषय :- वार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूकीची सूचना (नोटीस) दिनांक १५ सप्टेंबर २०२५ च्या बाबतीत प्रस्तुत शुध्दीपत्रकाची नोंद घेणेबाबत.**

महोदय,

वरील विषयी प्रस्तुत शुध्दिपत्रकान्वये आपणांस कळविण्यात येते की, दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणुकीची सूचना निर्गमित करण्यात आलेली आहे. सदर सूचना निर्गमित केल्यानंतर, असोसिएशन मध्ये मतदानास पात्र असलेल्या सभासदांची प्राथमिक यादी प्रसिध्द करण्यात आली होती व सदर यादीवरील आक्षेपांची सुनावणी पूर्ण झाल्यानंतर प्राथमिक सभासद यादीतील मतदानास पात्र असलेल्या २२ संलग्नित असोसिएशनची संख्या वाढून आज रोजी एकूण ३१ संलग्नित असोसिएशन मतदानास पात्र ठरलेल्या आहेत. त्या अनुषंगाने वार्षिक सर्वसाधारण सभेची व निवडणूकीची सूचना नवीन वाढीव संगलग्नित असोसिएशनला मिळणे आवशयक व त्यांना त्यांचे प्रतिनिधी कळविण्याकरिता वेळ वाढवून मिळणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या बहुतांश सदस्य असोसिएशन यांच्या व निवडणूक अधिकारी यांच्या मागणी व सूचनेनुसार, प्रवासाच्या दृष्टीकोनातून सर्वांना सोयीचे ठरण्याकरीता सदर विषयांकित सर्वसाधारण सभेचे ठिकाण बदलण्यासंबंधी माननीय अध्यक्ष यांच्या निर्देशाप्रमाणे खालील प्रमाणे शुध्दिपत्रक कळविण्यात येत आहे.

- विषयांकित वार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूकीची सूचना दिनांक १५ सप्टेंबर २०२५ मधील संलग्नित राज्य संघटनेचे दोन प्रतिनिधी पठविण्याचा कालावधी हा दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आला असून, अंतिम पात्र मतदार यादीतील सर्व संलग्नित असोसिएशनने सदर तारखेच्या सायंकाळी पाच वाजेपर्यंत फॉर्म ‘A’ सूचनेत नमूद कार्यालयाच्या पत्यावर पोहोच करावेत त्यानंतर आलेल्या फॉर्मचा स्विकार केला जाणार नाही.
- विषयांकित वार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणुकीची सूचना दिनांक १५ सप्टेंबर २०२५ ह्या सुचनेनुसार दर्शविण्यात आलेले सूचनेचे स्थळ बदलण्यात येत असून, सदर सभा महिला विकास मंडळ सभागृह, प्लॉट क्रमांक १, जनरल जगन्नाथ भोसले मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१ येथे घेण्यात येईल.

अध्यक्ष
मा.ना.श्री.अजित पवार
उपमुख्यमंत्री – महाराष्ट्र राज्य

महासचिव
श्री.नामदेव शिरगांवकर

- विषयांकित वार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणुकीची सूचना दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजीच्या सूचनेत नमूद विषय क्रमांक दहा मध्ये माननीय अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयात (अ) कार्यकारी मंडळाने निवडणुकीच्या अनुषंगाने घेतलेल्या सर्व निर्णयांना कार्योत्तर मंजुरी देणे या विषयाचा समावेश असेल, याची नोंद घ्यावी.

- प्रस्तुत शुध्दिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या सूचनेतील फॉर्म 'A' जमा करण्याचा कालावधी व सभेचे बदलेले ठिकाण वगळता अन्य सर्व सूचना व सूचनेतील विषय जशास तसेच लागू असतील, असे वाचण्यात व समजण्यात यावे.

(नामदेव शिरगांवकर)
महासचिव
महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन

**सोबत :**

१. वार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूकीची सूचना दिनांक १५ सप्टेंबर २०२५ची प्रत
२. महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन सन २०२५-२०२९ ची निवडणूक कार्यक्रम
३. निवडणूक उमेदवारी अर्ज - फॉर्म 'B'
४. निवडणूक माघार अर्ज
५. निवडणूक अधिकारी तसेच तक्रार निवारण अधिकारी यांचे नावे ई-मेल, कार्यालयीन पत्ता, फोन नंबर

**प्रत माहितीस्तव :**

१. मा.ना.श्री.अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री - महराष्ट्र राज्य,
व अध्यक्ष - महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन
२. मा. श्रीमती. पी. टी. उषाजी, अध्यक्षा – भारतीय ऑलिम्पिक संघ
३. मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त – धर्मादाय आयुक्त कार्यालय, मुंबई
४. मा. आयुक्त - क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महराष्ट्र राज्य,
श्री. शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे- बालेवाडी, पुणे.